महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

Rs.2/-

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

शनिवार ■ १९ जुलै २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक ०२८ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

# मिरारोडमध्ये मराठीची 'राज गर्जना'

## राज्य सरकारला आत्महत्याच करायची असेल तर खुशाल करावी - राज ठाकरे

"हिंदी भाषेच्या सक्तीमुळे हे सगळं सुरु झालं. राज्याचे मुख्यमंत्री काल म्हणाले की, हिंदी भाषा आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. राज्य सरकारला अशी आत्महत्या करणार असेल तर बिनधास्त करावी. त्या दिवशीच्या फक्त मोर्चाच्या धसक्याने निर्णय मागे घ्यावा लागला होता. महाराष्ट्रात हिंदी भाषा सक्ती करण्याचा प्रयत्न करुन तर बघा, दुकानं नाही तर शाळा बंद करीन. इतर शाळांमध्ये मराठी सक्तीची केली पाहिजे, ते सोडून मुख्यमंत्री हिंदी सक्तीच्या मागे लागलेले आहेत."

■ राज ठाकरे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मिरा रोडमधून त्रिभाषा सूत्र लागू करण्याबाबत घेतलेल्या भूमिकेबद्दल देवेंद्र फडणवीस यांच्यावर पलटवार केला. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मिरा रोडमध्ये मध्ये मनसैनिकांना संबोधित केलं. यावेळी राज ठाकरे यांनी भाषणाची सुरुवात मराठी बांधवांनो, भगिनींनो मातांनो अशी केली. याच भाषणात त्रिभाषा सूत्राचं समर्थन करणाऱ्या मुख्यमंत्र्यांना राज ठाकरेंनी आव्हान दिलं.

### दुकानंच नाही, तर शाळाही बंद करेन !

'काल आमचे मुख्यमंत्री फडणवीस, त्यांनी काल सांगितलं म्हणे, तिसरी हिंदी भाषा आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार. आता राज्य सरकारला आत्महत्या करायची असेल तर बेशक करावी. त्या दिवशीच्या मोर्चाच्या धसक्याने निर्णय मागे घ्यायला लागला होता. फडणवीस जी, तिसरी भाषा सक्तीची आणणार म्हणजे आणणार. तुम्ही पहिली ते पाचवी हिंदी आणण्याचा प्रयत्न तर करून बघा. दुकानं नाही, शाळाही बंद करेन.' असा थेट इशारा राज ठाकरेंनी सरकारला दिला आहे.

### दुबेंना दुबे दुबे कर मारेंगे' - राज ठाकरे कडाडले

भाजपचा कोण तरी दुबे नावाचा खासदार काय बोलला. पटक पटक के मारेंगे म्हणाला. झाली का त्याच्यावर केस. हिंदी चॅनलने चालवलं का. काही नाही. कसे असतात ते पाहा. तु आम्हाला पटक पटक के मारणार. दुबे. दुबेलाच सांगतो. दुबे, तुम मुंबई में आ जाव. मुंबई के समुंदर में दुबे दुबे कर मारेंगे'

### देवेंद्र फडणवीस यांना प्रतिआव्हान

राज ठाकरे म्हणाले,काय विषय होता, पहिली ते पाचवी राज्य सरकारनं हिंदी कम्पलसरी केली होती. पहिलीपासून हिंदी शिकली पाहिजे त्याच्यावरुन हे सुरु झालं. काल आमचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांनी काल सांगितलं म्हणे तिसरी हिंदी भाषा आम्ही सक्तीची करणार म्हणजे करणार, राज्य सरकारला आत्महत्या करायची असेल तर त्यांनी बेशक करावी. त्या दिवशीच्या मोर्चाच्या धसक्यानं निर्णय मागे घ्यायला लागला होता, अशी आठवण राज ठाकरे यांनी करुन दिली.



फडणवीस जी तुम्ही सांगतायना तिसरी भाषा सक्तीची आणणार म्हणजे आणणार मी आता सांगतो महाराष्ट्रात पहिली ते पाचवी ते हिंदी आणायचा प्रयत्न करुन बघा, दुकानं नाही शाळाही बंद करेन, असा इशारा राज ठाकरे यांनी दिला. महाराष्ट्र राज्याचा मुख्यमंत्री हिंदीसाठी भांडतोय, इतर बाकीच्या शाळांमध्ये मराठी सक्तीची केली पाहिजे. ते सोडून हिंदी सक्तीची करण्यासाठी लागलेला आहात. कुणाच्या दबावासाठी, कोण दबाव टाकतंय, काँग्रेस असल्यापासून सुरु आहे, असं राज ठाकरे म्हणाले.



मराठी विरूध्द हिंदी हा संघर्षच नाही तरीही राज ठाकरे तो दाखवण्याचा कसोशीने प्रयत्न करीत आहेत. मराठी भाषा ही महाराष्ट्रात सक्तीची आहेच व हिंदी सक्तीची नाही हे देवेंद्रजींनी स्पष्ट केले आहे वर्षानुवर्षे मुंबई महापालिका निवडणुका आल्या की मुंबई महाराष्ट्रापासून तोडणार अशी भाषणे नेहमी होतात परंतु राज ठाकरेंसारख्या सारख्या अभ्यासू नेत्यानेही तीच रिऽऽ ओढावी हे दुर्दैवीच...!

● केशव उपाध्ये

भाजपा प्रवक्ते







## महसूल विभागाची ठाणे खाडी परिसरात धडक कारवाई !

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे** - जिल्ह्यातील अंजूरगाव आणि आलीमघर खाडी परिसरात पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर बळावलेल्या अवैध हातभट्टी मद्यनिर्मितीवर राज्य उत्पादन शुल्क विभागाने जोरदार धडक कारवाई केली. बोटींच्या मदतीने खाडीत राबवलेल्या या विशेष मोहिमेत एकूण ९ लाख १६ हजार १०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अंतर्गत संबंधितांवर गुन्हे नोंदवण्यात आले आहेत.

मुसळधार पाऊसामुळे अवैध पद्धतीने रेती उपसा करणाऱ्यांना ज्या पद्धतीने पेव फुटते त्याच पद्धतीने मागील काही दिवसांपासून जिल्ह्यात अवैध पद्धतीने गावठी दारूची निर्मिती करणाऱ्या विरोधात कारवाई सत्र सुरू आहे. मागील आठवड्यात अंबरनाथ तालुक्यात येथेही हातभट्टीवर कारवाई करण्यात आली होती. याच पद्धतीने अंजूरगाव आणि आलीमघर खाडीत पावसाळ्याचा फायदा घेत खाडी भागात काही लोकांकडून मोठ्या प्रमाणावर अवैध दारू तयार केली जात होती. या बेकायदेशीर धंद्याला आळा घालण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने पावसाचे आव्हान स्वीकारत मुसळधार पावसात थेट खाडीत बोटीने प्रवेश करून ही कारवाई केली. या मोहिमेत २०० लिटर क्षमतेचे तब्बल १७८ ड्रम, १००० लिटर क्षमतेचे ३ बॉयलर, अंदाजे ३३ हजार ६०० लिटर रसायन, ३५ लिटर गावठी दारू आणि इतर हातभट्टीचे साहित्य जप्त करण्यात आले. यातील काही नाशवंत वस्तू घटनास्थळीच नष्ट करण्यात आल्या.

## दिशा उपक्रमामुळे ठाणे जिल्ह्यात मराठी शाळांच्या पटसंख्येत वाढ

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

● बातमीदार

**ठाणे :** राज्यात मराठी शाळांची पीछेहाट सुरू असल्याची चर्चा एकीकडे सुरू असताना, ठाणे जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत मात्र पटसंख्या वाढल्याचे चित्र आहे. शैक्षणिक वर्षे २०२५-२६ मध्ये जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीच्या वर्गात ११ हजारहून अधिक विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याची माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या दिशा उपक्रमाचा हा सकारात्मक परिणाम असल्याच्या चर्चा रंगू लागल्या आहेत.

ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ, शहापूर, कल्याण, भिवंडी आणि मुरबाड या तालुक्यांमध्ये जिल्हा परिषदेच्या १ हजार ३२८ शाळा आहेत. गेले अनेक वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या अनेक शाळांची झालेली जीर्ण अवस्था, शिक्षकांची अपुरी संख्या आणि शैक्षणिक साधनसामग्रीचा अभाव त्यात दुसरीकडे खासगी इंग्रजी माध्यमांकडे पालकांचा वाढता कल यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांतील पटसंख्येवर परिणाम होताना दिसत होता.

जिल्हा परिषदेच्या शाळांची ही परिस्थिती बदलावी यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या संकल्पनेतून गेले दीड वर्षांपासून दिशा उपक्रम राबविला जात आहे. या उपक्रमाचे राज्यस्तरावर कौतुक करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे जिल्हा परिषद शाळांची पटसंख्या वाढण्यास मदत झाली आहे. जिल्हा परिषद शाळेतील इयत्ता पहिलीच्या वर्गात यंदाच्या शैक्षणिक वर्षात ११ हजार ७९२ विद्यार्थ्यांचे प्रवेश झाल्याची माहिती प्राथमिक शिक्षण विभागाकडून देण्यात आली.



## गोविंदांना मिळाले विमाकवच!

### मुख्यमंत्र्यांचे क्रीडा विभागाला निर्देश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गोविंदांना सरकारकडून मिळणाऱ्या विमाकवचात वाढ करून ते दीड लाख गोविंदांना देण्यात यावे, अशी मागणी करीत आज दहीहंडी समन्वय समितीने मंत्री ॲड. आशीष शेलार यांच्या नेतृत्वाखाली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतली. मुख्यमंत्र्यांनीही सकारात्मकता दाखवत याबाबत क्रीडा विभागाला निर्देश दिले आहेत. राज्य सरकारने दहीहंडी या खेळाला साहसी दर्जा दिल्यापासून या खेळात गोविंदा पथकांचा सहभाग वाढला आहे आणि त्याचबरोबर खेळात सहभागी होणाऱ्या गोविंदांचा धोकाही वाढलेला आहे. सरकारने गेल्या दोन वर्षांपासून ७५ हजार गोविंदांसाठी विमाकवच देण्याचा निर्णय घेतलेला आहे.

## विधानभवनातील प्रवेशांवर टाच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

गुरुवारी विधानसभेच्या लॉबीमध्ये जोरदार राडा झाला, भाजप आमदार गोपिचंद पडळकर आणि राष्ट्रवादीचे आमदार जितेंद्र आव्हाड यांचे समर्थक एकमेकांना भिडले, प्रकरण शिविगाळ आणि मारहाणीपर्यंत पोहोचलं. हा राडा चक्क विधानभवनाच्या लॉबीमध्ये झाल्यानं आता या प्रकरणाची गंभीर दखल विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकरांकडून घेण्यात आली आहे. या राड्यानंतर राहुल नार्वेकर यांनी आमदारांना चांगलंच सुनावलं आहे, तसेच मोठा निर्णय घेतला आहे.

दरम्यान यापुढे आता विधानभवनात अभ्यांगतांना प्रवेश दिला जाणार नसल्याचा निर्णय राहुल नार्वेकर यांनी घेतला आहे. गेल्या काही दिवसांत आमदारांचे वर्तन हे चिंतेची बाब आहे, आमदारकीची शपथ घेताना आपण संविधानाबाबत दे बोलतो ते गांभीर्याने पालन करण्याची गरज आहे. म्हणून यापुढे फक्त आमदार व त्यांचे अधिकृत स्वीय सहाय्यकांनाच विधानभवनात प्रवेश दिला जाईल, असं नार्वेकर यांनी म्हटलं आहे. तसेच बहुतेक वेळा मंत्री विधीमंडळात बैठक घेतात, पण आता मंत्र्यांनीही त्यांच्या बैठका मंत्रालयात घेण्याच्या सूचना देत आहे. अपवादात्मक परिस्थितीत बैठक घेतली तर अभ्यांगतांना प्रवेश दिला जाणार नाही, असंही यावेळी नार्वेकर म्हणाले आहेत.



दरम्यान यावर बोलताना जितेंद्र आव्हाड यांनी आपली भूमिका मांडली आहे. मी सभागृहात एकटाच येतो, मी कुणाच्या पासवर सही करत नाही, चुकीचे रेकॉर्ड वर येऊ नये. मी घटना घडली तेव्हा सभागृहात नव्हतो. माझा घटनेशी कुठलाही संबंध नाही. मी कुणाला खुनावले ही नाही. या लोकशाहीच्या मंदिरात लोकशाही जीवंत आहे. मी मुख्यमंत्र्यांना याबाबत माहिती दिली आहे. मला धमक्या येत होत्या हे मी काल सांगितले, असं आव्हाड यांनी म्हटलं आहे.

"या अप्रिय घटनेनंतर मी सर्व आमदारांना सांगत आहे, विधीमंडळाची परंपरा जपण्याचे उत्तरदायित्त्व हे आमदारांचे आहे. आमदारांचे वर्तन हे विधीमंडळाची प्रतिमा उंचावणारे असावे अशा पवित्र ठिकाणी सर्वांनीच काही नियम पाळणे गरजेचे आहे. म्हणूनच लोकसभेच्या धर्तीवर नितीमूल्य समिती गठीत केली जाईल, याबाबतचा निर्णय एका आठवड्यात घेतला जाईल

- राहुल नार्वेकर



### पालिका कार्यालयातच पोलिसांच्या समोरच

## ठेकेदारांच्या दोन गटांमध्ये फ्री स्टाईल हाणामारी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**अंबरनाथ :** अंबरनाथ नगरपालिकेवर ठेकेदारांचा वरदहस्त असल्याचे पुन्हा एकदा दिसून आले आहे. ठेकेदारांच्या दोन गटांमध्ये पालिका कार्यालयातच जबर मारहाण सुरू झाली. ही फ्री स्टाईल हाणामारी चक्क पोलिसांच्या समोरच बराच वेळ सुरू होती.

अंबरनाथ नगरपालिकेत लहान मोठी कामे करणारा ठेकेदार बॉस्को सुसाईनाथ आणि व्यंकटेश पिचिकरन या दोन ठेकेदारांमध्ये गेल्या काही दिवसांपासून वाद निर्माण झाले होते. या प्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार देखील दाखल करण्यात आली होती. मात्र गुरुवारी (दि. १७ जुलै) पालिका कार्यालयात फेरीवाल्यांची निवडणुकीची प्रक्रिया सुरू असतानाच आणि पालिकेत चौक पोलीस बंदोबस्त असतानाच या दोन ठेकेदारांच्या गटांमध्ये फ्री-स्टाइल हाणामारी सुरू झाली.

या हाणामारीत व्यंकटेश या ठेकेदाराच्या समर्थकांनी बॉस्को याला जबर मारहाण करून गंभीर जखमी केले. ही फ्री स्टाईल हाणामारी सुरू असताना लागलीच पोलिसांनी आणि अंबरनाथ पालिकेच्या सुरक्षा रक्षकांनी या सर्वांना रोखण्याचा प्रयत्न केला. पोलीस हस्तक्षेप करीत असतानाही दोन्ही गट एकमेकांवर अंगावर धावून जात होते. या हाणामारीनंतर पोलिसांनी दोन्ही गटाच्या गुंडांना ताब्यात घेऊन पोलीस ठाण्यात कारवाईसाठी आणले आहे. या घटनेचीच सर्वत्र चर्चा सुरू होती.













## काँग्रेसचा विरोधी पक्ष नेते पदावर दावा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

विधानसभा विरोधी पक्षनेते पदाचे गुऱ्हाळ अजून सुरूच आहे. सरकारने हा मुद्दा सभापतींकडे टोलवला आहे. तर दुसरीकडे उद्धव सेनेचे अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील विरोधी पक्ष नेते पदाचा कार्यकाळ संपणार आहे. काल परवा त्यांचा निरोप समारंभ चांगलाच रंगला. या पदावर काँग्रेसने दावा ठोकला आहे. काँग्रेसच्या या फिरकीने हे पद त्यांच्या पदरात पडते का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. याविषयी पडद्याआड मोठ्या घडामोडी घडत आहे. हे पद काँग्रेसच्या झोळीत पडेल का? याविषयीची खलबंत सुरू झाली आहेत. लवकरच विरोधी पक्षनेता कोण याची घोषणा होईल.

### काँग्रेसचा विरोधी पक्ष नेते पदावर दावा

विधानपरिषद विरोधी पक्षनेतेपदाची काँग्रेसकडून मागणी करण्यात आली आहे. विधान परिषदेसाठी हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरे यांना गळ घातल्याची माहिती समोर येत आहे. काल हर्षवर्धन सपकाळ यांनी उद्धव ठाकरे यांची भेट घेतली असताना यावेळी ही विनंती केली असल्याची सूत्रांची माहिती आहे. विधान परिषदेत महाविकास आघाडीत काँग्रेसचे सर्वाधिक 8, शिवसेनेचे 6 तर शरद पवार गटाचे 3 आमदार आहेत.

### काँग्रेसकडून सतेज पाटील यांचे नाव चर्चेत

संख्याबळानुसार काँग्रेसला हे पद मिळावे अशी मागणी सपकाळ यांनी ठाकरे यांच्याकडे केली आहे. काँग्रेसने सतेज पाटील यांची विरोधी पक्षनेतेपदासाठी नाव चर्चेत आहे. अंबादास दानवे यांच्या आमदारकीची मुदत २९ ऑगस्टला संपत आहे. तोपर्यंत ते विरोधी पक्षनेतेपदावर कायम राहू शकतात. त्यानंतर हे पद काँग्रेसला मिळावे यासाठीच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. विधानसभेत जोपर्यंत विरोधी पक्ष नेते पदाचा निर्णय होत नाही. तोपर्यंत विधान परिषदेत संख्याबळावर काँग्रेसने या पदावर दावा ठोकला आहे.

# गीतासार



### अध्याय १७

### श्रद्धात्रयविभागयोगः

यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः । प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजन्ते तामसा जनाः ॥ १७-४ ॥

सात्त्विक माणसे देवांची पूजा करतात. राजस माणसे यक्ष-राक्षसांची तसेच इतर तामस माणसे असतात, ती प्रेत व भूतगणांची पूजा करतात. ॥ १७-४ ॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यन्ते ये तपो जनाः । दम्भाहङ्कारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ १७-५ ॥

जी माणसे शास्त्रविधी सोडून केवळ मनाच्या कल्पनेप्रमाणे घोर तप करतात तसेच दंभ, अहंकार, कामना, आसक्ती आणि बळाचा अभिमान यांनी युक्त असतात ॥ १७-५ ॥

कर्शयन्तः शरीरस्थं भूतग्राममचेतसः । मां चैवान्तःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ १७-६ ॥

जे शरीराच्या रूपात असलेल्या भूतसमुदायाला आणि अंतःकरणात राहणाऱ्या मलाही कृश करणारे असतात, ते अज्ञानी लोक आसुरी स्वभावाचे आहेत, असे तू जाण. ॥ १७-६ ॥

## तंत्रज्ञान

### ओपनएआय आता गुगल क्रोमला टक्कर देणार




जगभरातील ३०० कोटींहून अधिक लोक सध्या गुगल क्रोमचा वापर करत आहेत. हा जगातील सर्वात लोकप्रिय वेब ब्राउजर आहे. परंतु, ओपनएआयचा एआय सक्षम ब्राउजर क्रोमसह इतर सर्व वेब ब्राउजर्सपेक्षा अधिक शक्तीशाली असेल असं म्हटलं जात आहे. ओपनएआयचं हे पाऊल इंटरनेट जगताची दिशा बदलू शकतं. जगभरात क्रोमचा दबदबा आहे. ओपनएआय कंपनी हा दबदबा मोडून काढू पाहतेय.

**कसा असेल एआय सक्षम ब्राउजर?** ओपनएआय ब्राउझर केवळ वेगवान आणि सुरक्षितच नव्हे तर एआय आधारित सर्च, रिअल-टाइम वेब ॲक्सेस व चॅटजीपीटी इंटीग्रेशनसारख्या फीचर्ससह सुसज्ज असेल. हा ब्राउजर पारंपरिक वेब ब्राउजर्सपेक्षा खूप वेगळा असेल. यामध्ये युजर्सना वेबसाइट ॲक्सेस तर मिळेलच, यासह हा ब्राउझर एका इंटेलिजंट सहाय्यकाप्रमाणे काम करेल. युजर्सना स्मार्ट सजेशन, कॉन्टेंट समरी व क्विक रिझल्ट्स देईल. ओपनएआयने चॅटजीपीटी व इतर एआय आधारित टूल्सच्या आधी बाजारात स्वतःची ओळख बनवली आहे. आता कंपनी त्यांच्या युजर्ससाठी एआयच्या फीचर्ससह ब्राउजर सादर करण्याची तयारी करत आहे. या ब्राउजरमध्ये चॅटजीपीटीसारख्या एआयच्या क्षमता इंटीग्रेट केल्या जातील. तुम्ही कुठलीही वेबसाइट ओपन करण्याआधी एआयला प्रश्न विचारून माहिती घेऊ शकता. हा पर्याय गुगल सर्चप्रमाणेच काम करेल. तसेच युजर्सना त्यांच्या प्रश्नांची थेट उत्तरं मिळतील

**वेळेची बचत होणार :** हा वेब ब्राउजर युजर्सना कोणत्याही वेब पेजची समरी (Summary) देण्यास सक्षम असेल. उदाहरणार्थ, तुम्ही एखादं न्यूज आर्टीकल (बातमी) ओपन केली. एआय लगेच तुम्हाला त्या वेबपेजवरील माहितीची समरी (सारांश) प्रदान करेल. त्यामुळे तुमच्या वेळेची बचत होईल. तुम्हाला संपूर्ण बातमी वाचत बसावं लागणार नाही.

# नेते 'लाईव्ह' फाइट्स जनता 'डेड' साइलन्स!

सांगू का मित्रांनो, काय चाललंय देशात?
विधानभवनात रंग लागला कुस्तीच्या नाट्यात!
ना प्रश्नांवर चर्चा, ना उत्तरांना अर्थ,
'लोकशाही' गहाण पडते, हीच तर खरी व्यथा!

धिंगाणा दिवसभर, गडबड रात्रभर,
"सभागृहात शंख वाजे, हातात उरतो फक्त सुर!"
गाडीसमोर ठिय्या, मग गाडीखाली झोप,
पोलिसांनी ओढलं अंगाने, देश पाहतो हताश लोभ!

एकाने ओरडून केला आरोप चोराचा,
दुसऱ्याचं उत्तर — "तोंड आहे रणातल्या गजराचा!"
कुणी बोलतो झणझणीत, कुणी फिरतो साथ घेऊन,
लोकशाहीचं बोट हरवलंय, "TRP मात्र जोरात झळकतो रंगात पूर्ण!"

न्यायाच्या नावाखाली गाडला जातो निष्पाप,
गुन्हेगार हातपाय मोकळे, सामान्य जन मापात!
उतरतात कार्यकर्ते रस्त्यावर, टाईमपास राजकारण,
आंदोलनातच आता दिसते एक नवी मनोरंजनवाण!

शिक्षण, शेतकरी, रोजगार — कुणीच न विचारतं,
सर्वांच्या नजरा फक्त "LIVE" वरचं तमाशा पाहतं!
"राजकारण झालं शो, लोकप्रतिनिधी WWE!"
"लोकशाहीच्या नावाने, सुरू झाली चिखलफेक सिनेमी!"

कुठे नेऊन ठेवलाय माझा महाराष्ट्र, सांगाना रे आता?
शिवरायांच्या मातीवर, नाचतो राजकारणाचा तमाशा!
शेतकरी रडतो, विद्यार्थी थांबतो, नोकरीचं स्वप्नही पळतं,
आणि सभागृहात नुसती कुस्ती — 'दृष्टी' मात्र हरवलेली दिसते!

जनतेनो, विचार करा — हे का आपले निवडक?
की ढोल-ताश्यांत हरवले प्रश्न खऱ्याच मूलभूत?
खुर्चीच्या कुस्तीत देश हरवतो रूप,
सत्तेच्या नावावर हसतो आता जगातला YouTube!

नेत्यांचं भांडण, कार्यकर्त्यांची कुस्ती,
प्रश्न राहिलं — कुठं गेलं शिक्षण, रोजगार, शेतकऱ्यांची सुस्ती?
गुन्हेगार नेते, पोलिस 'दुर्बळ',
आणि संविधानाचा झाला हसवा-फसवी खेळ!

झोपून का मिळते आता प्रसिद्धीची टीप,
गुन्हेगारीला आता लागले राजकारणाचं क्लिप!
जनतेनो विचार करा — हे का आमचे नायक?
की 'Netflix पेक्षा भारी' झालेत आमदारांचे 'LIVE फाईट्स'?

हे का होतंय फक्त महाराष्ट्रात?
सत्तेसाठी चिखलफेक, गल्लोगल्ली हातघाई,
आता तरी विचार करा —
'लोकशाही' वाचवायची, की तमाशात गहाण टाकायची?'



- ॲड. प्रकाश रा. जगताप
८०९७२३६२९८
अध्यक्ष - कल्याण जिल्हा न्यायालय वकील संघटना

# बहुविध प्रतिभेचे धनी डॉ जयंत नारळीकर



**श्याम बसप्पा ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**

जगप्रसिद्ध खगोल - भौतिक शास्त्रज्ञ आणि विज्ञानकथा लेखक, पद्मविभूषण डॉ जयंत नारळीकर यांचे आज जयंती. डॉ जयंत नारळीकर यांचा जन्म १९ जुलै १९३८ रोजी कोल्हापूर येथे कोल्हापूर येथे झाला. त्यांचे वडील रँग्लर विष्णू वासुदेव नारळीकर हे प्रसिद्ध गणीततज्ञ होते. ते वाराणसी येथील बनारस विश्व विद्यापीठाच्या गणित विभागाचे प्रमुख होते तर आई सुमती या संस्कृत विदुषी होत्या. वाराणसी येथे शालेय शिक्षण पूर्ण केलेल्या नारळीकर यांनी १९५७ साली विज्ञानाची पदवी प्राप्त केली. (बीएस्सी ) त्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी ब्रिटनमधील केम्ब्रिज येथे गेले. तिथे त्यांनी बीए,एमए आणि पीएचडी या पदव्या मिळवल्या. शिवाय रँग्लर आणि खगोल शास्त्राचे टायसन मेडल आणि इतर अनेक बक्षिसे मिळवली. त्यांचे पिएचडीचे गाईड डॉ फ्रेड हॉईल यांच्या साथीने त्यांनी स्थिर स्थिती सिद्धांतावर संशोधन केले व जगप्रसिद्ध बिग बँग सिद्धांताला आव्हान देणारा नवा सिद्धांत तयार केला. १९६६ साली नारळीकर यांचा विवाह मंगला राजवाडे ( गणितज्ञ ) ह्यांच्याशी झाला. त्यांना तीन मुली आहेत गीता, गिरिजा लीलावती. १९७२ साली ते मुंबईत परतले. तिथे त्यांनी टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभागाचे प्रमुख म्हणून जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुणे येथील आयुका संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. डॉ जयंत नारळीकर यांनी पाच दशकांहून अधिक काळ खगोल आणि भौतिक शास्त्रात संशोधन केले. त्याच बरोबर सतत पुस्तके लिहिण्याचा कार्यक्रमही चालू ठेवला. डॉ जयंत नारळीकर हे रुढार्थाने साहित्यिक नसले तरी त्यांनी केलेले लेखन हे दर्जेदार साहित्यिकापेक्षा कमी दर्जाचे नाही. विज्ञान कथे सारखा वेगळा प्रवाह मराठी साहित्यात रुजविण्याचे मोठे काम त्यांनी केले. विज्ञाना सारखा रुक्ष आणि अवघड विषय ललित साहित्याच्या अंगाने मांडून त्याला सर्वसामान्य वाचकांपर्यंत पोहचवण्याचे अवघड व महत्वाचे कार्य त्यांनी केले. त्यांनी केलेले विज्ञानविषयक लेखन व सुरस विज्ञान कथा यामुळे विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लागली. खगोल शास्त्रात सातत्याने संशोधन करत असताना डॉ जयंत नारळीकरांनी लेखनही चालू ठेवले. त्यांनी अनेक विज्ञानकथा लिहिल्या. त्यांची यक्षाची देणगी, अंतराळवीर, भस्मासुर, टाइम मशीनची किमया, प्रेषित, अभयारण्य, याला जीवन ऐसे नाव, वामन परत आला, गणितातील गमतीजमती, नभात हसरे तारे, नव्या सहस्त्रकाचे नवे विज्ञान, विज्ञान आणि वैज्ञानिक, विज्ञानगंगेचे अवखळ वळणे, विज्ञानाची गरुडझेप, विज्ञानाचे रयचिते ही पुस्तके गाजली. त्यांनी लिहिलेले आकाशाशी जडले नाते व अंतराळ आणि विज्ञान ही पुस्तके प्रचंड गाजले. ही पुस्तके म्हणजे त्यांच्या दर्जेदार साहित्याचे उत्तम उदाहरण आहेत. तीन नगरातील माझे विश्व हे त्यांचे आत्मचरित्रही प्रसिध्द आहे. यक्षाची देणगी या त्यांच्या पहिल्याच पुस्तकाला महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळाला होता. सामान्य माणसाला खगोल शास्त्र समजवण्यासाठी त्यांनी अनेक वर्ष प्रयत्न केले. आपल्या लेखनातून त्यांनी अंधश्रद्धा दूर करण्याचाही प्रयत्न केला. बहुविध प्रतिभेचे धनी असलेले डॉ जयंत नारळीकर यांच्यासारख्या व्रतस्थ व्यक्तीमत्वास ९४ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाले हा त्यांच्या बहुविध प्रतिभेचा गौरव होता. डॉ जयंत नारळीकर यांच्यासारखे जेष्ठ विज्ञानविषयक लेखक साहित्य संमेलनाचे अध्यक्ष बनल्यामुळे विज्ञान साहित्याला अधिकाधिक प्रतिष्ठा लाभली तसेच विज्ञानाचा प्रसार होण्यास व तरुण पिढीमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होण्यास त्यांच्या साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा खूप उपयोग झाला. याच वर्षी २० मे २०२५ रोजी वयाच्या ८६ व्या वर्षी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने बहुविध प्रतिभेचे धनी असलेले व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. डॉ जयंत नारळीकर यांना जयंतीदिनी विनम्र अभिवादन!

# कल्याण पूर्वेत डम्पिंग ग्राउंडच्या विरोधात नागरिक रस्त्यावर

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

कल्याण : कल्याण पूर्वेतील १०० फुटी रोड, वसंत वाटीका जवळील पालिकेच्या भूखंडावरील निर्माणाधिन डंपिंग ग्राऊंडच्या विरोधात स्थानिक रहिवाशी आज रस्त्यावर उतरले. कल्याण पूर्वेतील १०० फुट रोड, शिवरल चौक येथे कल्याण डोंबिवली महानगरपालिका मलनिसारण आरक्षण क्र ३३० येथे होत असलेल्या कचरा एकत्रीकरण, प्रेसिंग कचरा वाहतूक व कचरा गाडयांचे वाहन स्थळ प्रकल्पास स्थानिक रहिवाश्यांचा विरोध असून या प्रकल्पा विरोधात रहिवासी आक्रमक



झाले आहेत. हा प्रकल्प मानवी वस्ती पासून दूर स्थलांतर कराण्याची मागणी या नागरिकांनी केली आहे. या प्रकल्पाला विरोध करण्यासाठी नागरिकांनी रस्त्यावर उतरून या प्रकल्पा विरोधात निदर्शने केली.

याबाबत आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष धनंजय जोगदंड यांनी प्रसिद्धी माध्यमांना प्रतिक्रिया दिली की, मनपाने कल्याण पूर्वेतील आरक्षण क्रं 330 या आरक्षणानुसार मलनिस्सारण, पाणी पुरवठा, उघान या ऐवजी आरक्षणात बद्दल करुन घनकचरा प्रकल्प उभारण्याचा घाट घातला आहे. मनपाने हरकती सूचना घेतल्या होत्या का बेकायदेशीर पणे होत असलेल्या घनकचरा प्रकल्पाला विरोध असून, नागरी आरोग्याच्या दुष्टीकोनातून या परिसरात हा प्रकल्प होणार नाही. विकासला आमचा विरोध नसल्याचे त्यांनी सांगितले.

# महिला सुरक्षिततेसाठी जगजागृती कार्यक्रम




**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

महाबळेश्वर : प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या अध्यक्षा सुरेखा कोसमकर यांच्या मार्गदर्शनानुसार जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा येथे पॉश ॲक्ट, पिडीत नुकसान भरपाई योजना तसेच समाजातील महिलांची सुरक्षितता व गोपनियता या विषयांवर जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास जिल्हाधिकारी संतोष पाटील, जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव निना नि. बेदरकर, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, ॲड. मनिषा बर्गे, ॲड, सुचिता पाटील, सहाय्यक लोकअभिरक्षक कार्यालय सातारा तसेच सर्व प्रशिक्षक व आयोजक उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाच्या सचिव निना नि. बेदरकर यांनी पिडीत नुकसान भरपाई योजना, नालसा योजना या विषयांवर मार्गदर्शन केले. त्यानंतर ॲड. मनिषा बर्गे यांनी पॉश ॲक्ट २०१३ (महिलांचा लैंगिक शोषणापासून संरक्षण कायदा, २०१३) या विषयी माहिती दिली. तर ॲड. सुचिता पाटील यांनी समाजातील महिलांची सुरक्षितता व गोपनियता या विषयी माहिती दिली.

# प्रियजन गुणगौरव समितीच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

मुरबाड : विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम यापुढे प्रियजन गुणगौरव समिती करणार असून पुढारी होण्यापेक्षा अधिकारी व्हा असा महत्वाचा सल्ला सिडकोचे मा.अध्यक्ष तथा राष्ट्रवादी कांग्रेस चे प्रदेश उपाध्यक्ष प्रमोद हिंदुराव यांनी मुरबाड येथे उपस्थित विद्यार्थ्यांना दिला. तसेच संगणकाचे प्रशिक्षण तुम्ही घ्या त्याची फी प्रियजन गुणगौरव समिती देईल असे आश्वासन त्यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना दिले.



मुरबाड येथे आज प्रियजन गुणगौरव समिती व राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच अजितदादा पवार यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन तालुक्यातील 10 वी 12 वी मध्ये उत्तम यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांच्या शुभ हस्ते गौरव करण्यात आला.

तर यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी घुगे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना पुढील भविष्यात नेमकं काय करायचं ते आधी ठरवा व तस मार्गक्रमण करा . मी सुद्धा मराठी माध्यमातून शिक्षण घेऊन आय.ए.एस. झालो . स्वप्न लहान बघू नका तर मोठी पाहा, महापुरुषांची चरित्रे वाचा , ध्येय निश्चित करा यश नक्की मिळेल. तर यावेळी त्यांनी स्वतः कशा पद्धतीने अभ्यास केला याविषयी विस्तृत मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक तालुका अध्यक्ष चंद्रकांत बोस्टे यांनी केले तर प्रतिक हिंदुराव यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

या कार्यक्रमास राष्ट्रवादी ठाणे जिल्हा ग्रामिणचे अध्यक्ष भरत गोंधळी, मुरबाड गटविकास

### विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देण्याचे काम यापुढे प्रियजन गुणगौरव समिती करणार -प्रमोद हिंदूराव

अधिकारी डॉ. लता गायकवाड, उपअभियंता संजय कोरडे, कल्याण तालुका अध्यक्ष बाळाराम कोर, कल्पना तारमळे, मुरबाड शहराध्यक्ष महेश जाधव , महिला शहराध्यक्षा आरती तेलवणे, राहूल हिंदुराव, विलास जाधव यांच्यासह मोठ्या संख्येने विद्यार्थी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे सदाबहार सुत्रसंचालन प्रा.शिक्षक राजकुमार कडव यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रियजन गुणगौरव समितीने विशेष मेहनत घेतली.

# जि.प. शाळेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप !




**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

शहापूर ग्रामीण : सरपंच साक्षी साठे व विशेष कार्यकारी अधिकारी ( महाराष्ट्र शासन) संतोष साठे यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद, शाळा खोपरी येथे आयोजित परिसरातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक मदतीचा हात म्हणून वाडा तालुक्यातील आबिटघर ग्रामपंचायत सरपंच साक्षी साठे व विशेष कार्यकारी अधिकारी संतोष साठे यांच्या माध्यमातून जिल्हा परिषद शाळा खोपरी येथे विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप हा उपक्रम हाती घेण्यात आला होता.

या कार्यक्रमावेळी खासदार डॉ. हेमंत सवरा, भाजपा जेष्ठ नेते बाबाजी काठोळे, जिल्हा उपाध्यक्ष संदीप पवार, नरेश आकरे, माजी तालुकाध्यक्ष मंगेश पाटील, जेष्ठ पदाधिकारी दिलीप पाटील, डॉ. गिरीश चौधरी, संतोष पाटील, हेमंत पष्टे, उमेश स्वामी, कांतीलाल गोरे, अर्चनाताई भोईर, दिक्षाताई पाटील, प्रताप पाटील, माजी महिला बालकल्याण सभापती धनश्री चौधरी, माजी सभापती अश्विनीताई शेळके, तसेच कुडूस,वाडा आणि सोनाळे मंडळ अध्यक्ष मोनीष पाटील, स्वप्नील रोठे, संतोष पाटील, केंद्र प्रमुख नवनाथ जाधव, जेष्ठ पत्रकार अशोक पाटील आदीजण उपस्थित होते.

# नियोजना अभावी मुंबई गोवा महामार्गाची दुर्दशा

**दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता**

पेण : मुंबई गोवा महामार्ग (NH१६) एक महत्त्वाची जीवनवाहिनी असूनही वर्षानुवर्ष दुर्दशा होत आहे. या महामार्गाची योग्य नियोजना अभावी दुर्दशा झाली असल्याचे मत पेण वाशी खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी व्यक्त केले. यासाठी अनेक कारणे कारणीभूत आहेत. त्याची कारणमीमांसा करायचे झाले तर कामाचा दीर्घ विलंब(Delay in Winding work) रस्त्याचे रुंदीकरण चार आणि सहा पदरी २००९/ १० साली मंजूर झाले होते. मात्र प्रत्यक्ष काम २०११/१२ मध्ये टप्प्याटप्प्याने सुरू झाले. कामात प्रगती न होता वर्षानुवर्ष ठेकेदार बदलत गेले .मर्जीतले नेमले गेले. आपापसात वाद निर्माण होऊन ,प्रकल्प रखडला, भू संपादनाचे अडथळे ,रस्त्याच्या दुतर्फा विस्तारीकरणासाठी शेत जमिनी, दुकाने, घरे, यांचे भूसंपादन करावे लागले. बऱ्याच ठिकाणी न्यायालयीन खटले भरपाई यामुळे दिरंगाई झालेली दिसून आली ,शिवाय राजकीय इच्छा शक्तीचा अभाव .अनेक सरकार बदलत गेली त्यामुळे त्या सरकारला जास्त लक्ष देतात असे नाही.

काम सुरू झालेकी वरवरचे निरीक्षण ,हवाई पाहणी केली, मात्र कामाकडे दुर्लक्ष झाले. मान्सून व हवामानाचा प्रभाव हा रस्ता कोकणातून जातो त्यामुळे दरड कोसळणे, रस्ता खाचणे, त्यामुळे काही वेळा काम बंद करावे लागते. या समस्या नित्याचाच आहेत.

,ठेकेदार व कामाचा दर्जा प्रश्न अनेक ठिकाणी उच्च दर्जाचे समान वापरण्यात येत नाही. कंत्राटदाराकडून कामामध्ये कुचराई, निधीची वाफदारी, भ्रष्टाचाराचे आरोप यामुळे दर्जा कमी वेळ जात असे घडते. वाहतूक आणि अपघातात वाढ सध्याचा रस्ता काही ठिकाणी अरुंद, वाहनाची प्रचंड वाढ त्यामुळे वाहतूक कोंडी आणि अपघात घडतात यामुळे स्थानिक व्यवसाय यावर परिणाम दिसून येत आहे, हक्काची जागा उड्डाण पुलामुळे फुकट गेली आहे....नवीन ठिकाणी त्याचे स्थलांतर होत आहे. खरे

**- सी.आर.म्हात्रे**

पाहता सर्व व्यवहार, टेंडर ऑनलाइन पारदर्शक झाले पाहिजे,

""माझा मामा येईल कामा"" अशी राजकीय देवाण घेवाण बंद झाली पाहिजे. केंद्रीय आणि राज्य स्तरावर योग्य निधीचा वापर होत आहे की नाही हे पाहिले पाहिजे. एकाच सक्षम एजन्सीकडून रस्त्याचे काम पूर्ण करून घेतले पाहिजे. लोकसहभाग, भूसंपादन पारदर्शकता असावी. सतत कामाच्या दर्जाची पाहणी असावी. कोकणातील भौगोलिक परिस्थितीनुसार, टनेल, बायपास, उड्डाणपूल याची निर्मिती, निष्कर्ष पाहिला पाहिजे. थोडक्यात मुंबई गोवा रस्त्याची दुर्दशा केवळ बांधकामाच्या दरातील त्रुटी, व्यवस्थापनाचा अभाव, आणि राजकीय उदासीनता यात आहे. साठमारी थांबली पाहिजे. हा रस्ता पूर्ण झाला तर कोकण विकासाचा कणा ठरेल यात शंका नाही. असेही सामाजिक कार्यकर्ते सी.आर. म्हात्रे यांनी सांगितले.

## आजचे राशि भविष्य



**मेष**
कुठेतरी अडकलेले पैसे परत मिळतील. आज तुम्ही तुमच्या व्यवसायाचा विस्तार करण्यासाठी काही नवीन योजना कराल, ज्याचा फायदाही होईल.

**वृषभ**
तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल. कुटुंबासाठी थोडा वेळ काढावा. आज तुम्ही काही कामात खूप व्यस्त असाल. सल्ला तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

**मिथुन**
तुम्हाला तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळेल. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. प्रॉपर्टीशी संबंधित लोकांना फायदा होईल.

**कर्क**
योग्य दिशेने कठोर परिश्रम केल्यास विद्यार्थ्यांना त्यांच्या करिअरमध्ये यश मिळेल. व्यवसायात अपेक्षेपेक्षा जास्त फायदा होणार आहे .अधिकारी तुमच्यावर खुश राहतील.

**सिंह**
नातेवाईकाच्या आगमनामुळे कुटुंबात आनंदाचे वातावरण असेल. आपणही एकत्र कुठेतरी बाहेर जाऊ. आज तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**कन्या**
व्यवसायानिमित्त प्रवास करावा लागेल. तुमच्या पालकांचा सल्ला तुमच्यासाठी उपयुक्त ठरेल. तुमच्या मुलाच्या यशाने तुम्ही आनंदी व्हाल.

**तूळ**
राशि फलादेश तुम्हाला अचानक आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे. आज तुम्हाला ऑफिसमध्ये एक नवीन प्रोजेक्ट मिळेल, जो तुम्ही पूर्ण करण्यात यशस्वी व्हाल.

**वृश्चिक**
तुमच्या आवडीच्या ठिकाणी बदली होण्याची शक्यता आहे. विद्यार्थ्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे. तुमचे कार्यालयीन काम पूर्ण करण्यात सक्षम असाल.

**धनु**
नियोजित महत्त्वाची कामे वेळेत पूर्ण होतील. वैवाहिक जीवनात गोडवा राहील. एखादी चांगली बातमी मिळाल्याने तुमचे मन दिवसभर प्रसन्न राहील.

**मकर**
तुम्ही गंभीर बाबी शांततेनेसोडवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. आज तुम्ही थोडे भावूकही होऊ शकता. तसेच, घाईघाईने कोणताही निर्णय न घेणे चांगले.

**कुंभ**
कुटुंबात आनंदाचे वातावरण राहील. तुम्हाला तुमच्या कामाच्या ठिकाणी लक्षणीय यश मिळेल. अभियंत्यांसाठी आजचा दिवस चांगला जाणार आहे.

**मीन**
आजचा दिवस खूप चांगला असेल. नोकरदार महिलांना चांगला दिवस जाईल. नवीन व्यवसायात सहभागी होण्याची संधी मिळेल. तुम्हाला उत्साही वाटेल.


जीवनदीप महाविद्यालय गोवेली ता. कल्याण
मुंबई विद्यापीठाशी संलग्न, नॅक मूल्यांकन प्राप्त
प्रवेश सुरू (२०२५•२६)
पदवी नंतर पत्रकारितेत करिअर करण्याची सुवर्णसंधी
एम.ए (एमसीजे)
(मास्टर ऑफ जर्नालिझम अँड मास कम्युनिकेशन)
-पात्रता-
कोणत्या शाखेतून पदवी उत्तीर्ण
- करिअर व्यवसाय व नोकरीची संधी -
टीव्ही चॅनेल्स, वृत्तपत्र, मॅक्झिन, रेडिओ, वेब मीडिया, जनसंपर्क, जाहिरात, चित्रपट निर्मिती, डिजिटल मीडिया या क्षेत्रांमध्ये संधी .
- प्रवेशासाठी संपर्क -
९४२१०५९३९६
goveli_jssp@rediffmail.com
www.jeevandeepcollegegoveli.in




जीवनदीप शैक्षणिक संस्था, पोई संचलित
जीवनदीप महाविद्यालय, गोवेली
कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B- Grade) प्राप्त
११ वी व १२ वी
कला, वाणिज्य, विज्ञान (IT / CS)
UNDER GRADUATION: B.Sc Data Science, B.Sc IT, B.Sc Chemistry Maths, BMS, BAF, B.Com, BAMMC, B.A.
POST GRADUATION: M.Sc IT, M.Sc Chemistry, M.Com Advanced Accountancy, MAMMC, M.A. Marathi, M.A. Economics, M.A. History, M.A. Sociology, M.A. Geography
Admission Open 2025-2026
आपलं कॉलेज हक्काचं कॉलेज
आजच आपला प्रवेश निश्चित करा!



7775851123, 8108559566
9619188558

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष

# गरजू आणि आर्थिक दुर्बल रुग्णांसाठी आशेचा किरण

आपल्या समाजात अनेक कुटुंबे अशी आहेत, ज्यांना अचानक उद्भवलेल्या गंभीर आजारामुळे किंवा अपघातामुळे मोठे वैद्यकीय खर्च करावे लागतात. अशा वेळी आर्थिक अडचणींमुळे अनेकांना योग्य उपचार मिळविणे कठीण होते. याच गरजू आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल रुग्णांना वैद्यकीय उपचार मिळावेत, यासाठी महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष (Chief Minister Medical Assistance Cell) सुरू केला आहे. हा कक्ष खऱ्या अर्थाने अनेकांसाठी 'जीवनदायी' ठरत आहे, आणि यामागे एक सुव्यवस्थित यंत्रणा कार्यरत आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्षाचे उद्दिष्ट आणि कार्यक्षेत्र: मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा मुख्य उद्देश हा राज्यातील गरजू नागरिकांना दुर्धर आणि महागड्या आजारांवरील उपचारांसाठी आर्थिक सहाय्य प्रदान करणे आहे. या निधीतून केवळ वैद्यकीय मदतच नाही, तर नैसर्गिक आपत्तींमुळे बाधित झालेल्या नागरिकांनाही आर्थिक सहाय्य पुरविले जाते. यामुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांना आरोग्य सेवेपासून वंचित राहावे लागू नये, यासाठी प्रयत्न केले जातात. मुख्यमंत्री सचिवालयाच्या दि. 13 ऑगस्ट 2015 च्या परिपत्रक क्र. मुमंसनि-2015/प्र.क्र.1/निधी कक्ष नुसार गेल्या काही वर्षांपासून मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष कार्यरत असून, या कक्षाच्या माध्यमातून हजारो रुग्णांना उपचार मिळाले आहेत.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाची (Chief Minister's Relief Fund and Charitable Hospital Assistance Cell) उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत:

1. आर्थिक दुर्बल रुग्णांना वैद्यकीय मदत पुरविणे: राज्यातील गरीब व गरजू नागरिकांना महागड्या व जीवनावश्यक उपचारांसाठी आर्थिक सहाय्य देणे (जसे को कर्करोग, हृदयरोग, किडनी प्रत्यारोपण, इत्यादी).
2. धर्मादाय रुग्णालयांमधील सुविधा वाढविणे: राज्यातील धर्मादाय (Charitable) रुग्णालयांना आवश्यक वैद्यकीय उपकरणे, औषधे किंवा सुविधा निर्माण करण्यासाठी सहाय्य करणे.
3. सरकारी आणि खासगी यंत्रणांमधील समन्वय: वैद्यकीय मदतीसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी आणि धर्मादाय रुग्णालयांमधील सेवा एकत्रित करून नागरिकांना सुलभ सेवा देण्याचा उद्देश.
4. आरोग्य सेवा उपलब्धतेत समता आणणे: गरीब, वंचित, आदिवासी व ग्रामीण भागातील लोकांनाही उच्च दर्जाची आरोग्य सेवा मिळावी, यासाठी प्रयत्न करणे.
5. सामाजिक जबाबदारी अंतर्गत रुग्णालयांकडून मदत मिळविणे: धर्मादाय रुग्णालयांनी त्यांच्या CSR (Corporate Social Responsibility) अथवा Trust च्या माध्यमातून अधिकाधिक गरीब रुग्णांवर मोफत किंवा सवलतीने उपचार करावेत, यासाठी त्यांच्याशी समन्वय ठेवणे.
6. त्वरित निर्णयप्रक्रिया व पारदर्शकता: रुग्णांच्या अर्जावर त्वरीत निर्णय घेणे व निधी वितरण प्रक्रियेत पारदर्शकता राखणे.

### राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्या:

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीच्या योग्य आणि पारदर्शक वितरणासाठी राज्य आणि जिल्हास्तरावर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. या समित्या निधीचा वापर योग्य गरजूंपर्यंत पोहोचतो की नाही याची खात्री करण्यासाठी नेमण्यात आल्या आहेत.

राज्यस्तरीय समिती (मंत्रालय स्तर)

राज्यस्तरीय समिती ही मुख्यमंत्री सहायता निधीच्या व्यवस्थापनाची आणि धोरणात्मक निर्णयांची शिखर संस्था आहे. मुख्यमंत्री कार्यालयाच्या अखत्यारित हा कक्ष कार्य करतो.

#### प्रमुख कार्ये:

- निधी वितरणाबाबत धोरणात्मक निर्णय घेणे.
- मोठ्या आर्थिक मदतीसाठीच्या अर्जांचे पुनरावलोकन करणे.
- राज्यभरातील निधीच्या प्रवाहावर नियंत्रण ठेवणे.
- नवीन आजार किंवा उपचारांचा निधीसाठी समावेश करण्याबाबत विचार करणे.
- राज्यातील सर्व जिल्हास्तरीय कक्षांशी समन्वय साधणे.

### जिल्हास्तरीय समिती (जिल्हाधिकारी कार्यालय):

राज्यातील आर्थिकदृष्ट्या गरजू रुग्णांना आर्थिक सहाय्य करण्याकरिता राज्यातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात 'मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्ष' सुरू करण्यात यावेत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले होते, त्यानुसार या कक्षाचे दि.1 मे 2025 रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून पालकमंत्री / मंत्री/ राज्यमंत्री यांच्या हस्ते संपूर्ण राज्यात उद्घाटन करण्यात आले. या कक्षाचे राज्यस्तरीय प्रमुख म्हणून रामेश्वर नाईक हे जबाबदारी सांभाळीत आहेत.

ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता कक्षाची जबाबदारी जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदिप माने, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.गंगाधर परगे यांच्या मार्गदर्शनाखाली डॉ. प्रियांका यादव व त्यांचे सहकारी कुशलतेने सांभाळीत आहेत.

राज्यातील गरजू रूग्णांना उपचारासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या माध्यमातून आर्थिक मदत पुरविली जाते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष सुरू करण्यासंदर्भात दि.22 फेब्रुवारी 2025 रोजी शासन निर्णय काढण्यात आला. शिवाय, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाची दि.23 एप्रिल 2025 रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली होती, या बैठकीत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना जिल्हास्तरीय मुख्यमंत्री सहाय्यता कक्ष पूर्ण क्षमतेने कार्यान्वित करणेबाबत निर्देश दिले होते.

वैद्यकीय उपचासाठी मदत मिळावी, याकरिता गरजू रूग्ण व त्यांचे नातेवाईक मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षाकडे मोठ्या प्रमाणात अर्ज करत असतात. अर्जाचा पाठपुरावा करण्यासाठी ते मंत्रालयात वारंवार येतात. रूग्ण व नातेवाईकांना होणारा त्रास लक्षात घेवून मुख्यमंत्री फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून रूग्ण व नातेवाईकांची परवड थांबविण्याच्या उद्देशातून हा कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीमध्ये रुग्णालय अंगीकृत करण्याची प्रक्रिया आणि मुख्यमंत्री वैद्यकीय अर्थसहाय्य वितरीत करणे, या दोन्ही प्रक्रिया संपूर्णतः निःशुल्क आहेत.नागरिकांची सोय लक्षात घेऊन, अर्ज प्रक्रिया अधिक सुलभ करण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी कार्यालयात मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष सुरू करण्यात आले आहेत. यामुळे अर्जदारांना मंत्रालयात जाण्याची गरज राहिलेली नाही, ज्यामुळे त्यांचा वेळ आणि पैसा दोन्ही वाचतो. जिल्हास्तरीय समिती ही स्थानिक पातळीवरच्या गरजा आणि अर्जदारांना तात्काळ मदत देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावते.

#### प्रमुख कार्ये:

- जिल्ह्यातील मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीसाठीचे अर्ज स्वीकारणे.
- अर्जांची प्राथमिक पडताळणी करणे आणि आवश्यक कागदपत्रांची पूर्तता तपासणे.
- लहान किंवा कमी गुंतागुंतीच्या वैद्यकीय प्रकरणांमध्ये त्वरित निर्णय घेऊन निधी मंजूर करणे.
- आवश्यकतेनुसार, अर्ज राज्यस्तरीय समितीकडे शिफारशीसाठी पाठवणे.
- रुग्णालयांशी समन्वय साधणे आणि उपचारांच्या प्रगतीवर लक्ष ठेवणे.




- स्थानिक गरजू रुग्णांना निधी योजनेची माहिती देणे आणि अर्ज भरण्यास मदत करणे.

ही प्रक्रिया अधिकाधिक कागदविरहित (Paperless) करण्याचा प्रयत्न केला जात आहे, ज्यामुळे अर्जदारांना अधिक सुलभपणे मदत मिळू शकेल.

### कोणत्या आजारांसाठी किती मदत? (आर्थिक मदतीची मर्यादा)

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून विविध दुर्धर आणि महागड्या आजारांसाठी आर्थिक मदत दिली जाते. या मदतीची रक्कम आजाराची तीव्रता, उपचाराचा खर्च आणि आवश्यकतेनुसार ठरवली जाते. साधारणतः, प्रत्येक आजारासाठी निश्चित केलेली कमाल मर्यादा असते, जी खालीलप्रमाणे असून ही माहिती बदलू शकते, अद्ययावत माहितीसाठी अधिकृत संकेतस्थळही तपासावे.

मात्र राज्याबाहेरील रुग्णालयांवर महाराष्ट्र शासनाचे यंत्रणांचे नियंत्रण नसते. तसेच त्यांच्याकडून उपयोगिता प्रमाणपत्र घेणे शक्य होत नसल्यामुळे राज्याबाहेरील रुग्णालयांना अर्थसहाय्य प्रदान करण्यास प्रतिबंध करण्यात आलेले आहे.

मुख्यमंत्री वैद्यकीय समितीच्या शिफारशीनुसार रुपये 25 हजार, 50 हजार, 1 लक्ष आणि महत्तम रुपये 2 लक्ष आजारांनिहाय मर्यादित रक्कम प्रदान करण्यात येते.

- कर्करोग (Cancer): कर्करोगाच्या उपचारासाठी (केमोथेरपी, रेडिएशन, शस्त्रक्रिया) मोठ्या प्रमाणात आर्थिक मदतीची आवश्यकता असते. यासाठी रु. 1,00,000 (एक लाख रुपये) पर्यंतची मदत मिळू शकते. गुंतागुंतीच्या किंवा महागड्या शस्त्रक्रियांसाठी ही मर्यादा वाढू शकते.
- हृदयविकार (Cardiac Diseases): हृदय शस्त्रक्रिया (बायपास, अँजिओप्लास्टी), हृदय प्रत्यारोपण यांसारख्या उपचारांसाठी रु.2,00,000/- (दोन लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
- मूत्रपिंड विकार (Kidney Diseases): मूत्रपिंड प्रत्यारोपण (Kidney Transplant) किंवा डायलिसिससाठी रु. 1,00,000/- (एक लाख रुपये) पर्यंत मदत दिली जाते.
- मेंदूविकार (Neurological Disorders): ब्रेन ट्यूमर शस्त्रक्रिया, पक्षाघातावरील उपचार यांसारख्या गंभीर मेंदूविकारांसाठी रु. 1,00,000/- (एक लाख रुपये) पर्यंत आर्थिक मदत मिळू शकते.
- अपघात आणि गंभीर दुखापती (Accidents & Major Injuries) ट्रॉमा: गंभीर अपघातांमुळे होणाऱ्या शस्त्रक्रिया, अवयव निकामी होणे, मुख्यत्वे डोक्याला गंभीर इजा यांसारख्या उपचारांसाठी रु. 50,000/- (पन्नास हजार रुपये) ते रु. 1,00,000/- (एक लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
- कॅन्सर (सर्व प्रकार) वरील उपचारांसाठी रु.2,00,000/- (दोन लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
- सेरेब्रो व्हॅस्कुलर ॲक्सिडंट (CVA) या बाबीवरील उपचारांसाठी रु.2,00,000/- (दोन लाख रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.
- प्रत्यारोपण शस्त्रक्रिया (Organ Transplants - इतर अवयव): यकृत प्रत्यारोपण, फुफ्फुस प्रत्यारोपण यांसारख्या अतिशय महागड्या शस्त्रक्रियांसाठी विशेष परिस्थितीत रु.1,50,000/- (दीड लाख रुपये) पर्यंत किंवा त्याहून अधिक मदत मिळू शकते. यासाठी ZTCC (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक असते.
- इतर दुर्धर आजार: वरील आजारांव्यतिरिक्त, ज्यांसाठी उपचार खर्चिक आहेत आणि रुग्णाला आर्थिक मदतीची नितांत गरज आहे, अशा इतर दुर्धर आजारांसाठीही रु. 50,000/- (पन्नास हजार रुपये) ते रु. 75,000/- (पंच्याहत्तर हजार रुपये) पर्यंत मदत मिळू शकते.

प्रत्येक प्रकरणाची तपासणी करून आणि वैद्यकीय अहवाल तसेच समितीच्या शिफारशीनुसार अंतिम मदत रक्कम ठरविली जाते.

आरोग्यासाठीच्या शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होण्यासाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधीमध्ये अर्ज करण्यापूर्वी पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

(1) डिस्चार्ज झालेल्या / उपचार पूर्ण झालेल्या रुग्णांना खर्चाची प्रतिपूर्ती म्हणून अर्थसहाय्य देय नाही.

(2) महात्मा ज्योतीबा फुले जनआरोग्य योजना (मोफत उपचार):- या योजनेच्या आपल्या जिल्ह्याच्या समन्वयकास (ठाणे जिल्हा- डॉ. प्रियांका यादव, वैद्यकीय अधिकारी, संपर्क क्र.9561729824) फोन करून पेशंटला नामतालिकेवरील (Empanelled) दवाखान्यात ॲडमिट करावे. www.jeevandayee.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

(3) चॅरिटी हॉस्पिटल (मोफत / सवलतीच्या दरात):- जिल्ह्यातील चॅरिटी हॉस्पिटलमधील उपलब्ध बेडबाबत माहिती चॅरिटी इन्स्पेक्टर / त्यांचे कार्यालयातून घेऊन त्यानुसार रुग्णास चॅरिटी बेड उपलब्ध असलेल्या दवाखान्यात ॲडमिट करावे. www.charity.maharashtra.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

(4) राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम (RBSK) (मोफत उपचार):- 0 ते 18 वर्षे वयापर्यंतच्या पेशंटसाठी या योजनेंतर्गत मोफत उपचार केले जातात. www.rbsk.gov.in या वेबसाईटवर हॉस्पिटलची यादी उपलब्ध आहे.

5. मुख्यमंत्री सहाय्यता निधी:- (1) कॉकलियर इम्प्लांट वय वर्षे 2 ते 6), (2) हृदय प्रत्यारोपण, (3) यकृत प्रत्यारोपण, (4) किडणी प्रत्यारोपण, (5) फुफ्फुस प्रत्यारोपण, (6) बोन मॅरो प्रत्यारोपण, (7) हाताचे प्रत्यारोपण, (8) हिप रिप्लेसमेंट, (9) कर्करोग शस्त्रक्रिया, (10) रस्ते अपघात, (11) लहान बालकांची शस्त्रक्रिया, (12) मेंदूचे आजार, (13) हृदयरोग, (14) डायलिसिस, (15) कर्करोग (केमोथेरपी / रेडिएशन), (16) अस्थिबंधन, (17) नवजात शिशुंचे आजार, (18) गुडघ्याचे प्रत्यारोपण, (19) बर्न रुग्ण (MLC), (20) विद्युत अपघात रुग्ण (MLC) या अशा एकूण 20 गंभीर आजारांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षातर्फे आर्थिक सहाय्य केले जाते.

उपरोक्त तीनही योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या आणि राज्यातील या योजनेत नोंदणीकृत रुग्णालयात उपचार घेणाऱ्या पात्र रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीतून वैद्यकीय समितीमार्फत तपासून अर्थसहाय्य दिले जाते. संपर्क क्रमांक: 022-22026948 / व्हॉट्सॲप क्रमांक: 9049789567.

सद्यःस्थितीत मुख्यमंत्री सहायता निधी कक्षास सुमारे 3 हजार 800 रुग्णालये संलग्नित आहेत. या रुग्णालयांची यादी वेबसाईटवर www.cmrf.maharashtra.gov.in उपलब्ध आहे.

- या योजनेचा लाभ महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम किंवा धर्मादाय रुग्णालये यांसारख्या इतर योजनांचा लाभ मिळू न शकणाऱ्या रुग्णांना दिला जातो, जेणेकरून मर्यादित निधीचा योग्य वापर होईल.
- रुग्णालयातून डिस्चार्ज मिळाल्यानंतर या निधीसाठी अर्ज करता येत नाही; उपचार सुरू असतानाच अर्ज करणे अपेक्षित आहे.

मनोज सुमन शिवाजी सानप
जिल्हा माहिती अधिकारी,ठाणे

### पात्रतेचे निकष आणि आवश्यक कागदपत्रे:

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीचा लाभ घेण्यासाठी काही पात्रता निकष आणि आवश्यक कागदपत्रे आहेत:

- उत्पन्नाचा दाखला: अर्जदाराच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. 1.60 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे. (तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला सादर करणे आवश्यक आहे.)
- आधार कार्ड: रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे आधार कार्ड. लहान मुलांसाठी आईचे आधार कार्ड आवश्यक.
- रेशन कार्ड: रुग्णाचे महाराष्ट्र राज्याचे रेशन कार्ड (केशरी किंवा पिवळ्या रंगाचे).
- वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक/प्रमाणपत्र: डॉक्टरांच्या सही-शिक्क्यानिशी मूळ वैद्यकीय खर्चाचे अंदाजपत्रक किंवा प्रमाणपत्र. खाजगी रुग्णालयाच्या बाबतीत, हे प्रमाणपत्र सिव्हील सर्जन यांनी प्रमाणित केलेले असणे आवश्यक आहे.
- संबंधित आजाराचे रिपोर्ट्स: आजाराशी संबंधित सर्व वैद्यकीय अहवाल (रिपोर्ट्स).
- अपघातग्रस्त असल्यास: FIR (First Information Report) किंवा MLC (Medico-Legal Case) रिपोर्ट आवश्यक.
- प्रत्यारोपण शस्त्रक्रियेसाठी: ZTCC (झोनल ट्रान्सप्लांट कोऑर्डिनेशन सेंटर) किंवा शासकीय समितीची मान्यता आवश्यक.
- रुग्णालयाची नोंद: उपचार घेत असलेल्या रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री सहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करणे आवश्यक आहे. (फक्त नोंदणीकृत रुग्णालयेच मदत निधीसाठी पात्र असतात.)

### अर्ज प्रक्रिया:

#### मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीसाठी अर्ज प्रक्रिया खालीलप्रमाणे आहे:

अर्ज व आवश्यक कागदपत्रे aao.cmrf-mh@gov.in या ई-मेल आयडीवर पाठविणे आवश्यक आहे.

- अर्ज डाऊनलोड करावा: मुख्यमंत्री सहाय्यता निधीचा विहित नमुन्यातील अर्ज संबंधित संकेतस्थळावरून (उदा. cmrf.maharashtra.gov.in) किंवा जिल्हाधिकारी कार्यालयातून प्राप्त करावा.
- कागदपत्रे जमा करावेत: अर्जासोबत वर नमूद केलेली सर्व आवश्यक कागदपत्रे स्व-साक्षांकित (Self Attested) करून जोडावीत.
- अर्ज सादर करावा: पूर्ण भरलेला अर्ज आणि कागदपत्रे आपल्या जिल्ह्यातील जिल्हाधिकारी कार्यालयातील मुख्यमंत्री सहायता कक्षात सादर करावीत. काही जिल्ह्यांमध्ये ऑनलाईन अर्ज स्वीकारण्याची सोय देखील उपलब्ध आहे.
- अर्जाचा पाठपुरावा: अर्ज सादर केल्यानंतर त्याच्या स्थितीची माहिती घेण्यासाठी संबंधित कार्यालयात संपर्क साधता येतो. अनेक ठिकाणी यासाठी टोल फ्री क्रमांक किंवा ऑनलाईन 'अर्ज स्थिती' तपासण्याची सुविधा उपलब्ध आहे.

1. अर्ज (विहीत नमुन्यात).
2. रुग्ण दाखल असल्यास त्याचा Geo Tag फोटो सोबत जोडणे / पाठवणे बंधनकारक आहे.
3. निदान व उपचारासाठी लागणाऱ्या वैद्यकीय खर्चाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (खाजगी रुग्णालय असल्यास सिव्होल सर्जन यांचेकडून हॉस्पिटल खर्चाचे अंदाजपत्रक प्रमाणित करणे आवश्यक आहे.)
4. तहसिलदार कार्यालयाचा उत्पन्नाचा दाखला घालू वर्षाचा (रुपये 1.60 लाखांपेक्षा कमी असणे आवश्यक आहे.)
5. रुग्णाचे आधार कार्ड (महाराष्ट्र राज्याचे) लहान बाळासाठी (बाल रुग्णांसाठी) आईचे आधारकार्ड आवश्यक आहे.
6. रुग्णांचे रेशनकार्ड (महाराष्ट्र राज्याचे).
7. संबंधित आजाराचे रिपोर्ट असणे आवश्यक आहे.
8. अपघातग्रस्त रुग्णांसाठी FIR रिपोर्ट आवश्यक आहे.
9. प्रत्यारोपण रुग्णांसाठी ZTCC / शासकीय समितीची मान्यता आवश्यक आहे.
10. रुग्णालयाची नोंद मुख्यमंत्री राहाय्यता निधी कार्यालयाच्या संगणक प्रणालीवर असल्याची खात्री करावी.

अर्थसहाय्याची मागणी ई-मेल द्वारे केल्यास अर्जासह सर्व कागदपत्रे PDF स्वरूपात (वाचनीय) पाठवून त्याच्या मूळ प्रती मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे टपालाद्वारे तत्काळ पाठविण्यात यावेत.

1 जानेवारी 2025 ते 30 जून 2025 दरम्यान मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या वतीने झालेली मदत

### शेकडो गरीब व गरजू रुग्णांना दिलासा:-

1 जानेवारी 2025 ते 30 जून 2025 दरम्यान या सहा महिन्यांच्या कालावधीत राज्यभरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल 14 हजार 651 रुग्णांना 128 कोटी 6 लाख 68 हजार रुपयांची वैद्यकीय मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधीमधून मंजूर करण्यात आली आहे.

FCRA सर्टिफिकेटमुळे परकीय देशातील देणगीचा मार्ग मोकळा:- जानेवारी महिन्यात मुख्यमंत्री सहाय्यता निधीला FCRA प्रमाणपत्र मिळाले, महाराष्ट्र-एफसीआरए प्रमाणपत्र मिळवणारे देशातील पहिले राज्य ठरले. त्यामुळे आता मुख्यमंत्री सहाय्यता निधीला परदेशातील व्यक्ती, संस्था, कंपन्यांकडून थेट आर्थिक मदत स्वीकारता येणार आहे.

'चरणसेवा' उपक्रमाची यशस्वी अंमलबजावणी:- वारीच्या काळात 'चरणसेवा' उपक्रमाद्वारे 2.75 लाख वारकऱ्यांना वैद्यकीय सेवा देण्यात आली, तर 10 लाखांहून अधिक नागरिकांपर्यंत आरोग्य विषयक जनजागृती पोहोचविण्यात आली.

महत्वपूर्ण तांत्रिक सुधारणा ऑनलाईन पडताळणी प्रणाली:- जून महिन्यात उत्पन्न प्रमाणपत्रांची पडताळणी महसूल विभागाच्या ऑनलाईन प्रणालीशी थेट जोडण्यात आली. त्यामुळे बनावट दस्तऐवजांना आळा बसला असून पात्र रुग्णांना जलद मदत मिळू शकते.

### धर्मादाय रुग्णालयांच्या कार्यक्षमतेवर लक्ष:-

धर्मादाय रुग्णालयांतर्फे देण्यात येणाऱ्या 10% मोफत आणि 10% सवलतीच्या उपचार सेवांची नियमित तपासणी व अहवाल प्रणाली अधिक सक्रिय करण्यात आली आहे.

एकूण मदत:- 148 कोटी 60 लाख 02 हजार

एकूण लाभार्थी संख्या:- 23 हजार 269

### विभाग:-

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी (CMRF), रुग्ण/लाभार्थी संख्या - 14 हजार 651 रूग्ण, मदत (रक्कम)-128 कोटी 6 लाख 68 हजार.

धर्मादाय, रुग्ण/लाभार्थी संख्या - 8 हजार 507 रूग्ण, मदत (रक्कम) - 15 कोटी 24 लाख 34 हजार.

नैसर्गिक/कृत्रिम आपत्ती, रुग्ण/लाभार्थी संख्या- 111 व्यक्तींना, मदत (रक्कम) - 5 कोटी 29 लाख.

एकूण - 23 हजार 269 लाभार्थी, मदत (रक्कम) - 148 कोटी 60 लाख 02 हजार.

मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता कक्ष हे महाराष्ट्रातील गरजू रुग्णांसाठी एक महत्त्वाचे आणि संवेदनशील पाऊल आहे. राज्यस्तरीय आणि जिल्हास्तरीय समित्यांच्या माध्यमातून, तसेच स्पष्ट पात्रता निकषांमुळे, ही योजना आर्थिक अडचणींमुळे कोणाचाही उपचार थांबू नये, यासाठी कार्यरत आहे. या कक्षाच्या माध्यमातून मिळणारी मदत खरोखरच अनेक गरजू कुटुंबांसाठी आशेचा किरण ठरत आहे.

# भिवंडी मनपाची अनाधिकृत बॅनर विरोधात कारवाई

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

भिवंडी : भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिका तर्फे अनाधिकृत बॅनर विरोधात तिव्र स्वरुपात कारवाई सुरु करण्यांत आली असुन मागील आठ दिवसांत १८२ अनाधिकृत बॅनर हटविण्यांत आले आहेत. सवर कारवाई यापुढे कायमस्वरुपी चालु ठेवण्यांत येईल. तसेच अशा प्रकारचे अनाधिकृत पोस्टर्स, बॅनर्स लावणा-यांवर यापुढे गुंन्हा दाखल करण्यांत येईल.

अनधिकृत फलक, बॅनर व पोस्टर हटविण्यासाठी मोहीम सार्वजनिक जागेचा बेकायदेशीर वापर थांबवा महानगरपालिका हद्दीतील मुख्य रस्ते, चौक, उड्डाणपूल, सार्वजनिक उद्याने, व वर्दळीच्या ठिकाणी अनधिकृत फलक, बॅनर, पोस्टर यांची वाढती संख्या ही शहराच्या स्वच्छतेला आणि सौंदर्याला बाधा पोहोचवत आहे. अशा प्रकारच्या अनधिकृत जाहिरात साहित्यामुळे वाहतुकीस अडथळा, सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता व दृष्यप्रदूषण निर्माण होत आहे. यावर नियंत्रण ठेवण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विशेष मोहीम राबविण्यात येत आहे.

### मोहीमेतील मुख्य बाबी

कोणत्याही प्रकारचे बॅनर, फलक, पोस्टर महानगरपालिकेची परवानगी न घेता लावले असल्यास ते त्वरित हटविण्यात येतील.संबंधित जबाबदार व्यक्ती / संस्था / राजकीय पक्ष यांच्यावर महानगरपालिका अधिनियम व महाराष्ट्र प्लास्टिक कचरा व्यवस्थापन नियम, 2016 अंतर्गत दंडात्मक कारवाई करण्यात येईल.

स्वच्छ भारत अभियान, शहर सौंदर्याकरण, आणि वाहतूक सुरळीततेसाठी ही कारवाई अत्यावश्यक आहे.

> **नागरिकांनी अशा अनधिकृत जाहिरात साहित्याची माहिती आपल्या विभागीय कार्यालयात कळवावी.**
> **– उपआयुक्त (जाहिरात व परवाना)**
> **भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका**

# मालमत्ता कर,पाणी बिल भरणा शिबिराला कल्याण पूर्वेत उस्फूर्त प्रतिसाद

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण : महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांच्या निर्देशानुसार अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, मालमत्ता कर विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली, न्यू रचना ज्येष्ठ नागरिक सेवा संस्था, रचना पार्क, तिसगाव, कल्याण (पूर्व) येथे आयोजित करण्यात आलेल्या मालमत्ता कर व पाणी बिल भरणा शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या शिबिरादरम्यान नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर सहभाग नोंदवत आपले कर भरण्याचे कर्तव्य बजावले.



एकूण ९१ कर भरणा पावत्यांद्वारे रु.१,७३,६३५/- इतकी रक्कम जमा करण्यात आली, तसेच ऑनलाईन माध्यमातून रु.९१,०००/- इतकी भर घालण्यात आली. यामुळे महापालिकेच्या महसूल संकलनात लक्षणीय वाढ झाली आहे.

शिबिरादरम्यान ५ मालमत्ता हस्तांतरण प्रकरणे तात्काळ निकाली काढण्यात आली, ही या उपक्रमाची खास बाब ठरली. या सेवेमुळे नागरिकांचा वेळ आणि खर्च वाचला असून त्यांनी या उपक्रमाचे कौतुक केले. महापालिकेच्या वतीने आयोजित या शिबिरामुळे नागरिकांना एकाच ठिकाणी सर्व सुविधा मिळाल्या. भविष्यातही अशा प्रकारच्या उपक्रमांचे आयोजन करण्यात यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# संविधानिक लाभ मिळवून घेण्यासाठी ओबीसी समाजाची एकजूट महत्वाची - नुरखाँ पठाण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य आयोजित राज्यस्तरीय विचार बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना संविधान अभ्यासक तथा प्रचारक आदरणीय नूरखा पठाण यांनी ओबीसीसाठी असलेल्या संविधानिक तरतुदी, ओबीसी आरक्षणासाठी नेमलेले विविध आयोग, ओबीसी समोरील भविष्यातील आव्हाने, ओबीसी चे आजचे वास्तव वर्तमानातील स्थान यासंदर्भात सखोल मार्गदर्शन केले.. ओबीसी समाज हा जातीच्या उतरंडीमध्ये मधल्या स्थानावर असल्याने आणि या प्रवर्गात अनेक जातींचा समावेश असल्याने त्याचबरोबर विविध धर्मातही ओबीसींच्या जाती असल्याने या जात समूहाचं संघटन होऊन सर्वांनी एकदिलाने ओबीसी प्रवर्गाची भाषा बोलणं गरजेचं आहे. तरच या प्रवर्गाचे असलेले लाभ या समूहाला मिळतील असे प्रतिपादन संविधान अभ्यासक तथा प्रचारक नूरखा पठाण यांनी केले. भारतीय राज्यघटना हे देशातील सर्वात महत्त्वाचा दस्तऐवज असून या घटनेचा अभ्यास ओबीसीतील प्रत्येक घटकांनी केल्यानंतरच आपणाला ओबीसीचे स्थान ओबीसीच्या प्रवर्गाची निर्मिती ओबीसीचा इतिहास ओबीसी समोर आव्हाने या संदर्भात काम करता येईल. प्रत्येक पदाधिकारी यांनी पहिल्यांदा राज्यघटनेचा सूक्ष्म अभ्यास करणे गरजेचे आहे, घटनेमध्ये जे दिली आहे त्यासाठी आपण घटनात्मक मार्गानेच संघर्ष करणे गरजेचे आहे, खाजगी क्षेत्रांमध्ये आरक्षण लागू नाही त्या ठिकाणी सुद्धा आपण संघटित होऊन काम करणे गरजेचे आहे अशा प्रकारचे प्रतिपादन यानिमित्ताने करण्यात आले, कोणतीही मागणी संविधानाच्या चौकटीत बसत असेल तरच ती मागणी मान्य होते अन्यथा ते मागणी मान्य होत नाही अशा प्रकारचं वक्तव्य अध्यक्षीय भाषणात आणि प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले यांनी केले. संघटना ओबीसीच्या विविध विषयावर मीटिंगमध्ये विविध तज्ञांना बोलावून आपल्या समाजाला सुशिक्षित करण्याचे काम या उपक्रमाच्या माध्यमातून करत आहे असे प्रतिपादन सरचिटणीस संतोष भोजने यांनी केले. यानंतर लातूर जिल्ह्यातील नूतन जिल्हा कार्यकारणीच्या अभिनंदनचा ठराव लहू राक्षे यांनी मांडला. या सभेमध्ये राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघाच्या वतीने प्रदेशाध्यक्ष अनिल नाचपले, सरचिटणीस संतोष भोजने, प्रदेश कार्याध्यक्ष बबनराव चव्हाण, प्रदेश प्रतिनिधी राजेंद्र खैरनार, महिला प्रदेशाध्यक्ष रेखाताई सुडे, हिरालाल पाटील, लहू राक्षे, अमरावती प्रीतीताई अरदक, सारिका आचमे, आनंद फुलसुंदर, अरुण जाधव, आदी पदाधिकारी उपस्थित होते.सभेचे सूत्रसंचालन संतोष भोजने तर आभार प्रदर्शन राजेंद्र खैरणार यांनी केले.



# अण्णाभाऊ साठेंच्या पुर्णाकृती पुतळ्यासाठी डोंबिवलीत धरणे आंदोलन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुर्णाकृती पुतळा स्मारक समितीने डोंबिवली पूर्व शहरात अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा या मागणीसाठी धरणे आंदोलन केले. समिती अध्यक्ष भुजंग कांबळे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. यावेळी रिपाईचे माणिक उघडे, कामगार संघटनेचे लक्ष्मण मिसाळ, समितीचे उपाध्यक्ष महादेव साळवे, सचिव सालिकराम दाढेल, खजिनदार साईनाथ घुले यांच्यासह अण्णाभाऊ साठे प्रेमी सहभागी झाले होते. यावेळी आंदोलनकर्त्यांनी शासना मार्फत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचा पुर्णाकृती पुतळा डोंबिवली पूर्व शहरात उभारण्यात यावा अशी मागणी केली. डोंबिवली शहरातील तमाम मांतग समाज, अण्णाभाऊ साठे साहित्य प्रेमी, बहुजन समाज यांच्या वतीने इंदिरा गांधी चौक, डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासमोर, डोंबिवली पूर्व येथे आंदोलन केले. या आंदोलनात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे प्रेमी उपस्थित होते. सरकारने जर अण्णाभाऊ साठे यांचा पुतळा उभारला नाही तर यापेक्षा मोठे धरणे आंदोलन करू असे सांगण्यात आले.



# शेतकरी योजनांच्या जनजागृतीसाठी कल्याण कृषी अधिकाऱ्यांनी ओढला नांगर



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : केवळ कार्यालयात बसून कारकुनी करण्यापेक्षा प्रत्यक्षात बळीराजांच्या शेतात जाऊन त्याच्यात आत्मविश्वास निर्माण करून विविध शासकीय योजनांची माहिती देण्याबरोबरच त्यांचे अनेक प्रश्न, अडचणी, समस्या ऐकून त्यावर मार्गदर्शन व उपाययोजना करण्याचे अंत्यत महत्त्वाचे काम कल्याण पंचायत समितीचे कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे व विस्तार अधिकारी एस एस संत, यांनी केले,ऐवढ्यावरच न थांबता कृषी अधिकारी श्री शिंदे यांनी चक्क आदिवासी शेतकऱ्यांच्या शेतात नांगर धरून जमिनीची मशागतही केली, हे सर्व घडवून आणले ते पत्रकार संजय कांबळे यांनी!

प्रसिद्ध विचारवंत व साहित्यिक एकनाथराव पवार यांनी सन २०११मध्ये कृषीदिनी थेट शेतकऱ्यांच्या बांधावर ही अभिनव मोहीम आणली, परंतु याची म्हणावी तेवढी अंमलबजावणी झाली नाही. परंतु याला ठाणे जिल्हा परिषद अपवाद ठरत आहे. कल्याण पंचायत समितीचे गटविकास अधिकारी संजय भोये यांच्या मार्गदर्शनाखाली कृषी अधिकारी बाबासाहेब शिंदे आणि विस्तार अधिकारी एस एस संत व पत्रकार संजय कांबळे यांनी सकाळीच ठाकूरपाडा येथील आदिवासी शेतकरी गणपत लुखा हिंदोळे यांच्या शेतावर भेट दिली, यावेळी त्यांनी लागवड केलेल्या शिरोली, वांगी, पडवळ, गोसाळी या भाजीपाला शेताची पाहणी करून किड नियंत्रण बाबतीत मार्गदर्शन केले, तसेच५०टक्के अनुदानावर दिलेल्या भात लागवड व ९०टक्के अनुदानावर दिलेल्या तूर बियाणांची लागवड उगवण क्षमता पाहून कृषी अधिकं-यानी समाधान व्यक्त केले. शिवाय या शेतकऱ्यांच्या शेतात नांगर धरून जमिनीची नांगरणी करून मशागत केली, तसेच फळबागे संदर्भात मार्गदर्शन केले. यावेळी शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त कृषी योजनांचा लाभ घ्यावा असे अवाहन त्यांनी केले. शेतकरी आपल्या शेतात आल्याने आदिवासी शेतकरी दिनेश हिंदोळे यांनी समाधान व्यक्त केले.

# वसई-विरार येथील प्रलंबित नागरी समस्यांबाबत उच्चस्तरीय बैठक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



शहापूर ग्रामीण : वसई-विरार येथील प्रलंबित नागरी समस्यांबाबत विविध प्रश्नांवर विधान भवन, मुंबई येथील मंत्रिमंडळ सभागृहात उच्चस्तरीय बैठक पार पडली.

वसई-विरार येथील प्रलंबित नागरी समस्यांबाबत सातत्याने पाठपुरावा करत महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे विशेष बैठकीची मागणी वसई आमदार स्नेहा दुबे (पंडित) यांनी केली होती.

या मागणीला सकारात्मक प्रतिसाद देत बुधवार दिनांक 16 जुलै रोजी विधान भवन, मुंबई येथील मंत्रिमंडळ सभागृहात वसई-विरारच्या विविध प्रश्नांवर उच्चस्तरीय बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत येथील जिल्हा परिषदेच्या शाळा आणि आरोग्य केंद्रे महानगर पालिकेकडे हस्तांतर करणे, महानगर क्षेत्रातील रस्ते आणि पूल, वसई-विरार मधील4 शहरांना अंतर्गत जोडणारा रिंग रोड,एसटी महामंडळाच्या जागांचा पीपीपी तत्वावर विकास करून वाहनतळासाठी जागा निर्माण करणे व भोगवटा प्रमाणपत्र (ओसी) नसल्याने नागरिकांना पिण्याचे पाणी मिळत नसल्याबाबत आदी नागरिकांच्या सकारात्मक बदल घडवण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय मुख्यमंत्री यांनी घेतले व त्याप्रमाणे कार्यवाहीचे आदेश दिले असल्याचे दिलेल्या प्रसिद्धी माध्यमाद्वारे म्हटले आहे.

या बैठकीसाठी आमदार स्नेहा दुबे (पंडित), खासदार हेमंत सवरा, आमदार राजन नाईक व संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## सांस्कृतिक कार्य विभागातर्फे

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकरिता राज्यस्तरीय स्पर्धेचे आयोजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



**५ लाख रुपयांचे प्रथम पारितोषिक**

ठाणे : पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, सांस्कृतिक कार्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या वतीने 'महाराष्ट्र राज्य उत्कृष्ट सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ स्पर्धा 2025' चे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे सहभागी होऊ शकतात. या स्पर्धेचा अर्ज पु.ल.देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, मुंबईच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या ऑनलाईन पोर्टलद्वारेच दि.20जुलै 2025 पासून दि.20 ऑगस्ट 2025 पर्यंत स्वीकारण्यात येणार असून अपूर्ण अर्ज रद्द ठरविण्यात येतील.

ही स्पर्धा निःशुल्क असून सांस्कृतिक कार्यक्रम, सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन, संस्कृतीचे जतन व संवर्धन याकरिता राबविण्यात आलेले उपक्रम, गडकिल्ले यांचे जतन व संवर्धन, राष्ट्रीय व राज्य स्मारके, धार्मिक स्थळे यांविषयी जनजागृकता तसेच जतन व संवर्धन, विविध सामाजिक उपक्रम व कार्ये, पर्यावरणपूरक मूर्ती, पर्यावरणपूरक सजावट, ध्वनिप्रदूषण रहित वातावरण, गणेशभक्तांसाठी केलेल्या सोयीसुविधा यांच्या आधारे केलेल्या कार्याचा गौरव व्हावा आणि समाजाभिमुख उपक्रम अधिकाधिक घडावेत त्यानुषंगाने प्रोत्साहनपर पुरस्कार देण्याचे शासनाचे उद्दिष्ट आहे. याच निकषांच्या आधारे स्पर्धेचे परीक्षण केले जाईल.

दि.27 ऑगस्ट पासून सुरू होणाऱ्या गणेशोत्सवात सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांनी गठीत केलेली जिल्हास्तरीय समिती या स्पर्धेत सहभागी मंडळे किंवा संस्थांच्या उत्सवस्थळाला भेट देतील आणि जिल्हास्तरीय परीक्षण पूर्ण करतील. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे आणि पुणे हे 4 जिल्हे प्रत्येकी 3 आणि हे 4 जिल्हे वगळता अन्य 32 अशा प्रत्येक जिल्ह्यातून एक यानुसार एकूण 44 शिफारसी राज्यस्तरीय परीक्षणासाठी स्वीकारल्या जातील. स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी सर्वांनी आपापल्या जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयाशी संपर्क साधावा.

राज्यस्तरीय परीक्षणात प्रथम तीन विजेत्यांना अनुक्रमे 5 लाख, 2.5 लाख आणि 1 लाख रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. तसेच अन्य जिल्हास्तरीय प्रथम विजेत्यांना 25 हजार रुपयांचे पारितोषिक व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात येणार आहे. या स्पर्धेत नोंदणीकृत संस्था किंवा परवानाधारक सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी अधिकाधिक संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केले आहे.




# मूलभूत सुविधांपासून कातकरी समाज वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी

## – मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

सातारा : प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत जिल्ह्यातील घरकुल, आरोग्य, वीज, पाणी, रस्ते, शिक्षण यासह विविध सुविधांपासून कातकरी समाज वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्या. या समाजाच्या कुटुंबांना मंजूर घरकुले येत्या 30 सप्टेंबरपर्यंत पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांनी दिले.

जिल्हा परिषदेच्या स्थायी सभागृहात प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभिय व धरती आबा जनजाती ग्राम उत्कष्ट अभियानाचा आढावा श्रीमती नागराजन यांनी घेतला. या आढावा बैठकीला अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी विश्वास सिद्द,



निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. युवराज करपे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलीपे, घोडेगाव जिल्हा पुणे येथील एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रदीप देसाई, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राचे सहायक आयुक्त सुनिल पवार यांच्यासह सर्व तालुक्यांचे गट विकास अधिकारी दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

प्रधानमंत्री जनजाती आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत सातारा जिल्ह्यासाठी 710 घरकुलांचे उद्दिष्ट आहे. यापैकी 346 घरकुलांना मंजुरी देण्यात आली असून 185 घरकुलांना पहिला हप्ता वितरीत करण्यात आला आहे. ही घरकुले येत्या 30 सप्टेंबरपर्यंत पूर्ण करा. ज्या ठिकाणी घरकुलांसाठी जागा नाही त्याठिकाणी शोध घेऊन शासकीय जमिनीचा प्रस्ताव द्यावा. ज्या जागेंच्या मोजणीचे पैसे भरले आहे त्या जागांची तातडीने मोजणी करावी. ज्या घरकुलांचे काम पूर्ण झाले आहे अशा घरकुलांना तातडीने नळ जोडणीसाठी हर घर जल नोंदणीसाठी त्वरीत ग्रामसभा घ्याव्यात, असे निर्देशही श्रीमती नागराजन यांनी दिल्या.

कातकरी समाजातील मुले शिक्षणापासून वंचित राहणार नाहीत यासाठी प्राथमिक शाळेत दाखल करावीत, अशा सूचना करुन श्रीमती नागराजन म्हणाल्या, कातकरी समाजातील बरीच कुटुंबे विविध दाखले, आधार कार्ड आयुष्मान कार्ड पासून वंचित आहेत. यासाठी तालुकानिहाय शिबीरांचे आयोजन करावे. धरती आबा जनजाती ग्राम उत्कर्ष अभियान राबविण्यासाठी आराखडा तयार करावा. एक आठवड्याच्या आत प्रत्येक विभागाने आराखडा तयार करुन एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्पाकडे सादर करावा, अशा सूचनाही मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती नागराजन यांनी केल्या.

# कल्याण डोंबिवली मनपाचे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांना अभिवादन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता



कल्याण : लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या स्मृतीदिनी आज महापालिका मुख्यालयात महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

तद्नंतर कल्याण (प.) मधील लाल चौकी येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे पुतळ्यासही महापालिका अतिरिक्त आयुक्त हर्षल गायकवाड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले.

यावेळी सहा. संचालक नगररचना संतोष डोईफोडे, माहिती व जनसंपर्क विभागाचे उपआयुक्त संजय जाधव, महापालिका सचिव किशोर शेळके,३/क प्रभागाचे सहा. आयुक्त धनंजय थोरात, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, सुरक्षा अधिकारी भरत बुळे, सहा.सुरक्षा अधिकारी सुरेश पवार, इतर अधिकारी/कर्मचारी तसेच आखिल भारतीय मातंग सेना- ठाणे जिल्हाध्यक्ष रवी अशोक गवळी, आखिल भारतीय मातंग सेना-शहर जिल्हाध्यक्ष मोहन मधुकर गवळी, अण्णाभाऊ साठे सार्वजनिक जयंती उत्सवाचे अध्यक्ष रामदास साबळे, लहुजी शक्ती सेना-ठाणे जिल्हाध्यक्ष श्रावण बनसोडे, राज्य उपाध्यक्ष श्रमिक (मुं.) पत्रकार संघाचे महेंद्र उर्फ अण्णा पंडीत, समाजबांधव तसेच नागरीक मोठया संख्येने उपस्थित होते .

# कल्याणमध्ये जीबीएसचा संशयित रुग्ण

## खाजगी रुग्णालयात उपचार सुरु

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा क्षेत्रात संशयित जीबीएस रूग्ण आढळला असून त्यांच्यावर खाजगी रूग्णालयात उपचार सुरू असून रूग्णाची प्रकुती स्थिर असल्याची माहिती अधिकारी सूत्रांकडून माहिती आहे. केडीएमसी मुख्य वैद्यकीय अधिकारी दीपा शुक्ल यांनी यानिमित्ताने माहिती दिली की, गुइलेन-बॅरे सिंड्रोम (GBS) आजाराचा संशयित रूग्णावर खाजगी गुरुवारी आढळला असून त्या रूग्णावर खाजगी रूग्णालयात उपचार सुरू आहेत. यानिमित्ताने नागरिकांना स्वच्छता बाबत काळजी घेणे हात स्वच्छ धुणे, तसेच कच्चे मांस, कच्चे अन्न खाऊ नये. आठवड्यापूर्वी अतिसार, विकनेस जाणवत असेल तर वेळीच उपचार घेणे ही खाबरदारी घ्यावी.

# मुंबई विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

शहापूर ग्रामीण : जीवनदीप शैक्षणिक संस्था संचलित कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खर्डी येथे समाजशास्त्र मंडळाच्या वतीने मुंबई विद्यापीठाचा १६९ वा वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी प्रा. शरद खाकर यांनी विद्यार्थ्यांना मुंबई विद्यापीठाचा गौरवशाली इतिहास उलगडून सांगितला. तसेच जीवनदीप शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रविंद्र घोडविंदे सर यांच्या संकल्पनेतून मुंबई विद्यापीठ माझा अभिमान या विषयावर विद्यार्थ्यांनी शॉट व्हिडिओ अंतर्गत जवळपास ७० विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रियंका पवार यांनी केले. कार्यक्रमास विद्यार्थी, प्राध्यापक वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# महाराष्ट्र महिलांच्या सन्मानार्थ काम करेल ; सर्वांनी मिळून संकल्प करुया

## – राष्ट्रीय महिला आयोग अध्यक्षा विजया रहाटकर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता





ठाणे : आपण सर्वांनी मिळून संकल्प करुया, महिलांच्या सन्मानार्थ महाराष्ट्र राज्य काम करेल, अशा प्रकारे कायद्याची अंमलबजावणी करुया, असे आवाहन राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांनी आज कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई व निवारण) अधिनियम 2013 (POSH act) नुसार अंतर्गत समितीच्या अध्यक्षांकरिता जिल्हा नियोजन समिती सभागृहात आयोजित एकदिवसीय प्रशिक्षण कार्यशाळेत केले.

या प्रशिक्षण कार्यशाळेस मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ.डी.स्वामी, राष्ट्रीय महिला आयोगाच्या शिवानी डे, अप्पर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, राज्य महिला आयोगाच्या उपसचिव डॉ.पद्मश्री बैनाडे, महिला व बालविकास विभागाच्या आयुक्तालयातील परिविक्षा अधीक्षक दत्तात्रय मुंडे, विभागीय उपायुक्त सुवर्णा पवार, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, उमेदच्या प्रकल्प संचालक छायादेवी शिसोदे, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) रूपाली भालके, उप जिल्हा निवडणूक अधिकारी वैशाली माने, पोलीस उपायुक्त रश्मी नांदेडकर, पौर्णिमा चौगुले, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी नमिता शिंदे यांच्यासह विविध शासकीय कार्यालयातील POSH ACT नुसार गठीत अंतर्गत समिती (IC) अध्यक्ष तसेच आपल्या अधिनस्त क्षेत्रीय कार्यालयातील IC अध्यक्ष, महिला अधिकारी कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित आहेत.

राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर पुढे म्हणाल्या की, हा कायदा सर्वांसाठी समान असून राष्ट्रीय महिला आयोग हे महिलांच्या सर्वांगिण विकास, पीडित, शोषित महिलांना न्याय मिळवून देणे, महिलांना सन्मान, आर्थिक सशक्तीकरण यासाठी काम पाहते. महिलांसाठी देशामध्ये वेगवेगळे 17 सेल कार्यरत असून त्यांच्या माध्यमातून महिलांसाठी विविध कामे केली जातात. महिलांसाठी तक्रार निवारण समिती गठीत करण्यात येते, परंतू काही कार्यालयांमध्ये समित्या फक्त कागदावर आहेत. त्या प्रत्यक्षात काम करत नाहीत. या समितीला सिव्हील कोर्टाचे अधिकार आहेत. या समितीकडे आलेल्या तक्रारीची नि:पक्षपातीपणे, गोपनीयतेने चौकशी करुन न्याय देण्याचे काम करते. सर्व कार्यालयांमध्ये 3 महिन्यातून एकदा समितीची बैठक घेण्यात यावी. यामध्ये चर्चा करुन महिलांना येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी केले. यावेळी त्यांनी राष्ट्रीय महिला आयोगाच्या अध्यक्षा श्रीमती विजया रहाटकर यांचा परिचय करुन दिला. जिल्ह्यामधील तक्रार निवारण समितीचा आढावा सादर केला.

कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते तुळशीच्या रोपाला पाणी घालून व दिप प्रज्वलनाने झाली. श्रीमती विजया रहाटकर यांचे स्वागत जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांनी पुष्पगुच्छ, तुळशीचे रोप, पुस्तक आणि शासनाचे मुखपत्र "लोकराज्य" मासिकाचे अंक देवून केले.या कार्यशाळेमध्ये राष्ट्रीय महिला आयोगाच्या तुनिका शर्मा यांनी POSH ACT विषयी उपस्थितांना सविस्तर मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयाचे अधिकारी-कर्मचारी, जिल्हा परिषदेचे जिल्हा कार्यक्रम अधिकारी, सर्व नागरी व ग्रामीण बालविकास प्रकल्प अधिकारी यांनी मोलाचे सहकार्य केले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुजा वडेकर यांनी केले.




Printed by AIS Printing Solution Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
printed at Thane and published at Building No-B-24,Room no-9,gholap Nagar, Murbad Road, Neyr Anpam Nagar Kalyan west editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.